# आंबेडकरवादी कवयित्रींच्या कविता' : नव्या दिशा

**डॉ. अनिल बोपचे**
सहा. प्राध्यापक – मराठी विभाग प्रमुख
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय,
कोंढा–कोसरा, ता.पवनी, जि.भंडारा
९४२३४११४३
dranilbopche2010@gmail.com

**सारांश**:–

आंबेडकरवादी साहित्याने एकूणच मराठी साहित्य विश्वात आपले वेगळे स्थान निर्माण केले. किंबहुना भारतीय साहित्यातही आंबेडकरी साहित्याने आपली पताका डोलायमान ठेवली. विश्व साहित्यानेही आंबेडकरी साहित्याची दखल घेतली, हे सांगणे नव्हे. या साहित्याला 'दलित साहित्य' या नावानेही ओळखले जाते. तसेच 'बौद्ध साहित्य' असेही या साहित्याला संबोधले जाते. या साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्यामुळे आपसूकच 'आंबेडकरवादी साहित्य' ही संज्ञा उचित ठरते. या साहित्याअंतर्गत आंबेडकरवादी कवयित्रींनी आपल्या कवितेतून स्त्रियांच्या दु:खांना वाचा फोडल्याचे प्रकर्षाने दिसून येते. आपल्या कवितांमधून या कवयित्री दलित, शोषित, पीडित, वंचित स्त्रियांचे दु:ख उजागर करतात. स्त्रियांची या पुरुषसत्ताक व्यवस्थेकडून कशी विटंबना केली जाते याचेही चित्रण अधिक जोमदारपणे या कवितांमधून केल्याचे दिसून येते. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता ही नवी दिशा दाखविणारी आहे. या कवितांमधून केवळ स्त्रियांच्या दु:खाचीच मांडणी केलेली नाही तर स्त्रियांनी अबला न राहता सबला कसे व्हावे अशी दिशादर्शक मांडणी केलेली दिसून येते. त्यामुळेच आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितांना एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**प्रस्तावना** :–

आंबेडकरवादी साहित्यातील कवयित्रींच्या कवितांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. या कवयित्रींनी शोषित, पीडित, वंचित अशा स्त्रियांची बाजू आपल्या कवितांमधून सक्षमपणे मांडली. पुरुषसत्ताक व्यवस्थेचा विद्रूप चेहरा आपल्या कवितांमधून त्यांनी उघड केला. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून स्त्रियांच्या कमकुवतपणाचेच नुसते चित्रण केलेले नाही तर दलित स्त्रिया कशा सक्षम बनतील याचाही उहापोह केलेला दिसून येतो. दलित स्त्री या जागतिकीकरणाच्या युगात कशी टिकाव धरेल, कशी धीरोदात्तपणे समोरे जाईल अशाही दृष्टीकोनातून ही कविता साकार झालेली आहे. सुगंधा शेंडे, हिरा बनसोडे, मल्लिका अमरशेख, ज्योती लांजेवार, कुसुम गांगुर्डे, उषा अंभोरे, छाया कोरेगावकर, मीना गजभिये, कविता मोखणकर, विमल गाडेकर, डॉ. सरिता जांभुळे, सुरेखा भगत, डॉ. आशा थोरात, संध्या रंगारी, उषाकिरण आत्राम, लीला वाघमारे, डॉ. प्रतिभा सुरडकर, कुसुम अलाम, प्रज्ञा दया पवार, प्रज्ञा लोखंडे या कवयित्रींनी प्रस्तुत साहित्यप्रवाह समृद्ध केलेला आहे. आबेडकरवादी कवयित्रींनी जे भोगलं, जे पचवलं, जे सहन केलं, किंवा विरोध केलं या सर्व बाबींचा गोषवारा त्यांच्या कवितेत प्रकर्षाने दिसून येतो. आबेडकरवादी कवयित्रींनी आपल्या कवितांमधून आजच्या समाजव्यवस्थेचे चित्रण केले. मानवी प्रवृत्ती किती

हिणकस स्वरूपाची असते याचेही चित्रण त्यांनी आपल्या कवितांमधून केलेले दिसून येते. एकूणच समग्र दृष्टीतून आंबेडकरवादी कवयित्रीची कविता साकार झाली आहे असे प्रत्ययास येते.

**आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेचे महत्व :—**

आजचे हे जग अत्यंत धकाधकीचे आहे. सर्वत्र जगात विसंगती ठासून भरल्याचे चित्र दिसत आहे. आजही आंबेडकरवादी समाजाची गळचेपी होताना दिसून येते. ही विसंगती वर्षानुवर्षापासून चालत आलेली आहे. मात्र या विसंगतीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घणाघाती विचारांनी लगाम लावला. ‘‘त्यांच्यामुळे दलित ‘माणसात’ आला. त्याच्या ठिकाणी आत्मसन्मान, आत्मविश्वास, आत्मावलंबन कुणी निर्माण केले असेल तर बाबासाहेबांनीच! त्यांच्या मुक्तीलढ्याच्या आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबंध आहे.’’[१] एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे दलित आत्मभान जागृत झाले. या आत्मभानातूनच आंबेडकरवादी कवयित्रींनी आपली कविता साकार केली. यातूनच आंबेडकरवादी समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य केले. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेत निळ्या पहाटे उत्साहाने गायली जाणारी स्तोत्रे स्वरूप मांडणी दिसून येते. ही कविता प्रयोगवादात रमलेली दिसत नाही तर ती अस्सल भारतीय जाणिवांनी निर्माण झालेली आहे. त्यामुळेच ती आपले स्वत्व राखून कलात्मक शिखर गाठण्यास सज्ज होते. मुळातच आंबेडकरवादी कवयित्रींनी आपली कविता सर्वांगीण भान ठेवूनच साकार केली आहे.

आंबेडकरवादी कवयित्रींची कविता ही समाजकाळातील एक पर्वणी आहे. ही या काळातील एक अभ्यसनीय समृद्ध दालन ठरते. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेने मराठी काव्याच्या विश्वात एक नवीन सामाजिक संवेदनाशीलता प्रखरपणे समोर आणली. ‘‘शतकानुशतकांच्या अन्यायाची जाण, त्याविरुद्ध लढण्याची ईर्षा, असह्य वेदनांनी ठणकणारा भूतकाळ, नव्या अशा अपेक्षांनी पल्लवित झालेला भविष्यकाळ, समतेचे अभिवचन आणि प्रत्यक्ष व्यवहारातील कुंचबणा, डॉ. बाबासाहेबांची शिकवण, त्यांच्याबद्दलचा आदरभाव, अभिमान, त्यांच्या शिकवणीतील तेजस्वी अश्रध्दा, बंडखोरी, मनुप्रणीत समाजव्यवस्था उखडून टाकण्याची जिद्द हे या संवेदनाशिलतेचे विशेष होत.’’[२] या गुणवैशिष्टयांमुळेच आंबेडकरवादी कवयित्रींची कविता अग्रेसर राहिली. इतकेच नव्हे तर या कवितेने अगदी यशस्वीरित्या मार्गक्रमण केले. आंबेडकरी समाजालाच नव्हे तर एकूणच भारतीय समाजाला नव दिशा दाखविण्याचे उत्तुंग कार्य या कवयित्रींनी आपल्या कवितांमधून केले.

आंबेडकरी कवयित्रींची कविता ही जागृत अशा वाटा—वळणांनी जाते. ही कविता माणुसकी जपण्याची भाषा बोलते. या अनुषंगाने आंबेडकरवादी कवयित्री मीना गजभियेंची कविता साकार होते. त्या आपल्या ‘पिपळवृक्ष’ कवितेत आपली भावना प्रकट करतात

‘‘माणसं घडविण्याची प्रयोगशाळाच जणू ........
घडली जात आहेत मनं
कुठल्या मुशीतून ?
ओठात हसू, पोटात विष
उक्ती आणि कृती ह्यांचा कसा नाही ठेवायचा मेळ
तीच सुरू आहे पद्धतशीर कवायत.’’[३]

आपल्या कवितेतून मीना गजभिये यांनी माणुसकीविरहीत विसंगतीवर प्रहार केलेला आहे.

मल्लिका अमरशेख यांच्याही कवितेतून आंबेडकरवादी विचारसरणी प्रकर्षाने उजागर होते. त्या 'संभावित सूर्यासारखे' या कवितेत म्हणतात.

''मला हे पहायचं नाहीय्
आणि मला हे संपावायचंय सगळं......
असं डोळे मिटून काही होणाराय् का?
इथल्या प्रत्येक लहान पोराच्या
डोळयांत असणारं वठलेलं झाड
इथल्या प्रत्येक आईचा पदर
असंख्य जळवांनी भरलेला,
हे सगळे पहाताना डोळे मेणाचे होतात
आणि मन होतं अश्वत्थाम्याची चिरंजीव वेदना.''[४]

या कवितेतील दृष्टी ही आंबेडकराची दृष्टी आहे. आंबेडकरी प्रज्ञाचक्षूतून मांडणी करत मल्लिका अमरशेख जगातील दु:ख सर्वांसमक्ष मांडतात.

हिरा बनसोडे ह्याही आंबेडकरवादी कवयित्री म्हणून प्रख्यात आहेत. त्यांच्या 'पौर्णिमा' (१९७०) व 'फिर्याद' (१९८४) या दोन्ही काव्यसंग्रहातून त्यांनी स्त्रियाच्या हलाखीचे वर्णन केले आहे. स्त्री ही पुरूष मानसिकेतेची कशी गुलाम आहे हेही त्यांनी येथे दाखविले आहे. त्यांच्या कवितेतून आंबेडकरी समाजाचे दु:ख, संताप व स्त्रियांच्या सर्वांगीण वेदना व्यक्त होतात.

''या क्रांतीच्या वाटेवर मी लाल गुलाब रोवलेत
मागच्यांना पाऊल खुणा मिळाव्यात म्हणून,
प्रत्येक झाडावर कोरली आहेत प्रतिज्ञेची अमर वाक्ये''[५]

प्रस्तुत 'गीत विद्रोहाचे' या कवितेतून कवयित्री हिरा बनसोडे यांनी एक आशावादी दृष्टी प्रकट केली आहे. स्त्रियांनी आपल्यावरील होणारे अन्याय–अत्याचार धुडकावून लावले पाहिजे अशा स्वरूपाची प्रचिती या कवितेतून येते.

ज्योती लांजेवार हे आंबेडकरवादी कवयित्रींमधील मोठे नाव. 'दिशा' हा त्यांचा पहिला कविता संग्रह होय. त्यांच्या कवितेचा प्राण म्हणजे सामाजिकता होय. त्यांच्या कवितेतून अस्पृश्य समाजाचे दु;ख व स्त्रियांचें दु:ख अशा दुहेरी भोगवट्याचे आक्रंदन प्रभावीपणे व्यक्त झालेले दिसून येते. आपल्या 'अनामिकास' या कवितेत त्या म्हणतात,

''इथे भीक मागून काहीच मिळत नसते
दया आणि माया,
अन्यायासाठी दावे करावे लागतात,
आसवांची नसते किंमत तेव्हा
पाण्यासाठी लढे द्यावे लागतात,
विझलेला धूर लपेटायचा नसतो,
निखाऱ्यांची उब पेरावी शरीरात''[६]

एकूणच ज्योती लांजेवार या आबेंडकरवादी कवयित्रीची कविता ही मानवतेच्या अक्षावरील नवविचारांची पेरणी करणारी, संसूचन करणारी ठरते.

कवयित्री आशा थोरात यांनी आपल्या 'पानगळ' या काव्यसंग्रहात स्त्रियांच्या दु:खाची करुण गाथा मांडली. त्या स्त्रियांचे दु:ख मांडताना म्हणतात,

''देव देव करता, देवानं काय देल्लं,
देवानं काय देल्लं, सारं जीनं वाया गेल्लं,
आता घालू नका जोहार, लागू नको पाया,
भीमरायानं लावला, बुध्दाचा हा दिवा''[७]

आपल्या कवितेतून कवयित्रीने परिवर्तन ीलतेचा आशावाद प्रगट केलेला आहे.

एकूणच आंबेडकरवादी कवयित्रीनी आपल्या कवितेतून नवपरिवर्तनाची नवी दिशा रोखठोकपणे दाखविण्याचे कार्य हिरीरीने केल्याचे प्रत्ययास येते.

**निष्कर्ष :—**

समाजाला जागृत करण्यात कवींचा मोलाचा वाटा असतो. मुळात कवी समाजाला नवीन स्वप्ने देतात व समाज जीवन समृध्द करतात. एक व्यापक भूमिका घेऊन कवीची कविता साकार होते. त्यामुळेच अशा कवीची कविता काळाच्या कसोटीवर टिकून राहते. त्याच्या कवितेतून परिवर्तनाची नांदी जागोजागी प्रत्ययास येते. आंबेडकरवादी कवयित्रींची कविता अशाच स्वरूपाची आहे. समाजजागृतीचे पडघम याही कवितेतून दिसून येते. ही कविता दिवसेंदिवस वृध्दिगंत होत चाललेली आहे. या कवितेच्या माध्यमातून आजची स्त्री जनसुधारणेची तुतारी घेऊन चाललेली आहे असे वाटते. आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेतून जो आशावाद प्रकट होतो, तो निश्चितच स्फुरण देणारा आहे. सकारात्मक दृ टकोनातून आंबेडकरवादी कवयित्रींच्या कवितेची वाटचाल सुरू आहे. काळासमोरील आव्हाने या कवयित्री पेलत आहेत. त्यांची सामाजिक जाणीव व्यापक झालेली आहे. याचेच पडसाद त्यांच्या कवितेत उमटतात. एकूणच आंबेडकरवादी कवयित्रींची कविता अतिशय मोलाची आहे. दलित, ोि ित, पीडित, वंचित या सर्वांना ही कविता नवी दिशा दाखविणारी आहे.

**संदर्भ :—**

१. फडके भालचंद्र, 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती २०००, पृ. ११३.
२. कुलकर्णी अनिरूध्द (संपादक), 'प्रदक्षिणा' खंड दुसरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९१, पृ. ३३.
३. मेश्राम केशव (संपादक), 'विद्रोही कविता', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, ति. आ. १९९४, पृ. १०२.
४. मेश्राम केशव (संपादक), कित्ता, पृ. १०४—१०५.
५. मेश्राम केशव (संपादक), कित्ता, पृ. ११५.
६. मेश्राम केशव (संपादक), कित्ता, पृ. ११२.
७. नारनवरे इ.मो. (संपादक), 'दलित साहित्य पत्रिका' (स्मरणिका), (अकरावे अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन, नागपूर) जानेवारी २०११, पृ. १२६.